MHST110000892018

## नियमीत दिवाणी मुकदमा क्र.७/२०१९ मधील नि.२० वरील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ व २ विरुध्द तूर्तातूर्त ताकिद मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**वादी यांचे कथनांचा सारांश पुढीलप्रमाणे :–**

२. मौजे कुडाळ, ता.जावली, जि. सातारा येथील ग्रामपंचायत हद्दीतील मिळकत याचा सि.स.नं.१०३४ क्षेत्र ९७.७ यात असणारी खालील घर मिळकती या दाव्याचा वादविषय असून येथून पुढे त्यास ''*दावा मिळकती* '' असे संबोधण्यात येत आहे.

| अ.क्र. | मिळकतीचे वर्णन |
|---|---|
| **१अ** | ग्रामपंचायत मिळकत नं.३०१७ यांचे ग्रामपंचायत रेकॉर्डप्रमाणे वर्णन उत्तराभिमूखी पूर्व पश्चिम ६ मी. दक्षिण उत्तर ७.३० मी., दगड, माती वर कौले यांची अंदाजे किंमत रु.५०,०००/– यांसी चतूःसिमा पूर्वेस – श्री. दत्तात्रय तरटे यांचे घर, दक्षिणेस – लालसिंगराव शिंदे यांची मोकळी जागा, पश्चिमेस – श्री. चव्हाण यांचे घर, उत्तरेस – ग्रामपंचायत रस्ता |
| **१ब** | ग्रामपंचायत मिळकत नं.३०१८ यांचे ग्रामपंचायत रेकॉर्डप्रमाणे वर्णन उत्तराभिमुखी पूर्व पश्चिम ६० मी. दक्षिण उत्तर ७.३० मी. दगड, माती वर कौले यांची अंदाजे किंमत रु.५०,०००/– यांसी चतूःसिमा पूर्वेस – श्री. दत्तात्रय तरटे यांचे घर, दक्षिणेस – लालसिंगराव शिंदे यांची मोकळी जागा, पश्चिमेस – श्री. चव्हाण यांचे घर, उत्तरेस – ग्रामपंचायत रस्ता |

३. वादीचे कथन की, वादी ही मयत संभाजी यांची सून असून मयत संभाजी यास नारायण, पांडुरंग (मयत), सुभाष, शिवाजी प्रतिवादी क्र.१ व २ अशी तीन मुले होती. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी प्रतिवादी क्र.४ ते ८ विरुध्द दावा मिळकतीविषयी याच न्यायालयात रे.दि.मु.नं.३४/१९९९ दाखल केला होता. मालकी व कब्जा ठरविण्याच्या दाव्यामध्ये या वादी यांना पक्षकार करणे आवश्यक होते. एवढेच नव्हेतर सदरील वादी हे मयत संभाजी यांचे थेट वारस आहेत. मयत संभाजी यांनी त्यांचे मृत्यूपूर्वी कोणतेही तबदीलीचा दस्त अगर व्यवस्थापन केलेले नव्हते असे असताना मयत संभाजीच्या असणाऱ्या वडीलार्जित मिळकतीमध्ये या वादी यांना हक्क निर्माण झालेला आहे.

४. वादी पुढे कथन करतात की, रे.दि.मु.नं.३४/१९९९ चा निकाल प्रतिवादी क्र.१ व २ यांच्यासारखा झाल्यावर अन्य प्रतिवादींनी त्यावर अपिल केले होते व ते फेटाळले गेले. त्यानंतर प्रतिवादी क्र.१ व २ यांनी या न्यायालयात रे.दरखास्त नं.२/२०१८ दाखल केली व दि.२४.०९.२०१९ रोजी दावा मिळकतीचा कब्जा मिळणेकामी अर्ज दाखल केला. वास्तविक पाहता, दावा मिळकतीमध्ये वादींचा हक्क आहे मात्र तो किती हिस्स्याचा आहे हे अद्याप ठरलेले नाहीत. तसेच, मयत पांडूरंग यांचे वारसांना हक्क मिळाले अथवा नाही याचीही निश्चिती झालेली नाही. दरम्यान प्रतिवादी क्र.१ व २ हे दावा मिळकतींचा ताबा घेतील व वादीला त्यांचे हक्कापासून वंचित रहावे लागेल.

५. वादी पुढे कथन करतात की, दावा वाटपाचा असल्याने व सर्व मिळकती वडीलार्जित असल्याने तसेच, वादी यांना जन्मतः हक्क असल्याने दावा मिळकतींचा कब्जा देणे घेण अगर तबदीली होण हे वादींवर अन्यायकारक आहे. सबब, रे.द.नं.२/२०१७ मधील दोन्ही घराचे कब्जा देणे विषयीच्या हुकूमास स्थगिती दिल्यास प्रतिवादी क्र.१ व २ यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट तसे न झाल्यास वादीचे कधीही व कशानेही न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. न्यायाचा तराजू वादीच्या बाजूने आहे. वादी यांना प्रथमदर्शनी केस आहे. सबब, रे.द.नं.२/२०१८ मधील कब्जे वॉरंट अगर कब्जेची प्रक्रियेस स्थगिती देणेची विनंती केली आहे.

६. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी निशाणी क्र.२४ वर म्हणणे दाखल करुन तीव्र हरकत घेतली. प्रतिवादीचे कथन की, वादीचा दावा खोटा लबाडीचा व दिशाभुल करणारा असून तो या प्रतिवादीस मान्य व कबूल नाही. सबब वादीचा दावा खर्चासह फेटाळण्यात यावा.

७. वादीचे दावा कलम १अ, १ब, १क मधील नमुद केलेली जमीन व घर मिळकती याच्याशी वादीचा कसलाही हक्कहितसंबंध नाही. तसेच घर मिळकतीचे लिहीलेले वर्णन तसेच दाखविलेली किंमत ही देखील खोटी व लबाडीची असुन ते या प्रतिवादीस मान्य व कबूल नाही. त्याच प्रमाणे सदर मिळकतीशी वादीचा कसलाही हक्क हितसंबंध कधीही नव्हता व नाही. वादीस सदर मिळकतीबाबत दावा करण्यास कोणतेही Locus Standi नाही.

८. वादीचे दावा कलम २ व ३ मधील मजकूर खोटा, लबाडीचा व दिशाभुल करणारा असुन तो या प्रतिवादीस मुळीच मान्य व कबूल नाही. वादीने दिलेली वंशावळ साफ खोटी, लबाडीची दिशाभुल करणारी असून ती या प्रतिवादीस मान्य व कबूल नाही. नारायण हा संभाजीचा मुलगा म्हणून जे दाखविले आहे ते साफ खोटे लबाडीचे आहे. तसेच वादी नं. १ पत्नी व वादी नं. २ मुलगा असे जे नमुद केलेले आहे ते ही साफ खोटे व लबाडीचे आहे. तसेच पांडूरंग व त्यांचे वारस म्हणून जे प्रतिवादी नं. ३ ते ८ दाखविले आहेत त्याचाही या मिळकतीशी काही संबंध नाही. नारायण हे क्षयरोगाने मयत झाले, रत्नाबाई ही माहेरी राहू लागली. तसेच संभाजी हयात असताना वादी कुडाळ येथे येवून जावून होती. तसेच ती तेथे राहत होती. तसेच एकत्रात अविभाज्य हिस्सा आहे वगैरे मजकूर साफ खोटा व लबाडीचा दिशाभूल करणारा असून तो प्रतिवादीस मान्य व कबूल नाही.

९. वादीचे दावा कलम ४ ते ६ मधील मजकूर खोटा, लबाडीचा असून तो या प्रतिवादीस मान्य व कबूल नाही. रे.दि.मु.नं.९२/१९९७ च्या दाव्यात नोटीस मिळाली होती. परंतू पांडूरंग दत्तक गेल्याने वादी हजर झाले नाहीत किंवा दत्तकाबद्दल खात्रीशीर माहिती

मिळाली नाही. तसेच रे.दि.मु.नं. ३४/१९९९ मध्ये शंभो याने मिळकती बांधलेल्या आहेत. वादीचा दावा मिळकतीत अर्धा हिस्सा आहे. तसेच त्यांचे वाटप होवून मिळावे इत्यादी वादीचे कथने साफ खोटी व लबाडीची असून ती या प्रतिवादीस मान्य व कबूल नाहीत.

१०. वादीचे दावा कलम ७ ते ९ मधील संपूर्ण कथने खोटी व लबाडीची असून ती या प्रतिवादीस मान्य व कबूल नाहीत. दाव्यास कोणतेही कारण घडले नाही. कारण घडले असे जे दाखविले आहे ते साफ खोटे व लबाडीचे आहे. दाव्याची आकारणी तसेच वादीची विनंती पूर्णपणे खोटी लबाडीची आहे. सबब वादीचा दावा साफ खोटा व लबाडीचा असून तो प्रतिवादीस मान्य व कबुल नाही सबब वादीचा दावा खर्चासह रद्द करण्यात यावा.

११. रत्नाबाई नारायण वाघ, दिलीप नारायण वाघ यांचा व मयत नारायण यांच्याशी काहीही संबंध नाही. तसेच संभाजी यास नारायण नावाचा मुलगा नव्हता व नाही. त्यामुळे वादीने तथाकथीत नारायण यास लबाडीने संभाजीचा मुलगा म्हटलेले आहे ते पुर्णपणे खोटे व लबाडीचे आहे. या दाव्यातील वादी मुखत्यार किसन बंडू जाधव हा लॅण्ड माफीया असून कोणाचेही कसलेही संबंध नसताना खोटे नाटे दावे करणे व गोरगरीब शेतकरी यांच्या जमीनी हडप करणे असा उद्योग वादी मुखत्यार करतो. त्याप्रमाने प्रतिवादी नं. ३ ते ८ यांनी रे.दि.मु.नं. ९२/१९९७ चा दाखल केला होता. त्यात हे प्रतिवादी नं. १ व २ हे देखील प्रतिवादी होते व त्या दाव्यात सदरची मिळकत प्रतिवादी नं. १ व २ यांची मालकी हक्क वहीवाटीची धरली व त्या जमीनीशी प्रतिवादी नं. ३ ते ८ यांचा काही संबंध नाही. असा अंतीम निकाल झाला. त्याप्रमाणे रे.दि.मु.नं. ३४/१९९९ चा दावा प्रतिवादी नं. १ व २ यांनी, प्रतिवादी नं. ३ ते ८ यांच्या विरूद्ध दाखल केला व तो दावा प्रतिवादी नं. ३ ते ८ यांच्या विरूद्ध डिक्रीड झाला.

१२. रे.दि.मु.नं.९२/१९९७ चा दावा प्रतिवादी नं.३ ते ८ यांनी वाटपासाठी दाखल केला होता. सदर दाव्यात प्रस्तुत वादी यांना सामील केलेले नव्हते. त्यानंतर या प्रतिवादी नं.३

ते ८ यांनी रे.दि.मु.नं.९२/१९९७ मध्ये ते वारस आहेत असे म्हणून दावा चालू असताना दावा दुरुस्ती करुन त्यात सामील केले व त्यातही प्रतिवादी नं. ३ ते ८ यांचा काही टिकाव लागणार नाही. मग खोटे नाटे भासवून सदर दावा प्रतिवादी नं.४ ते ८ यांनी अस्तित्वात आणलेला आहे. सदर दाव्याच्या कामी रे.दि.मु.नं. ९२/१९९७ मध्ये या प्रतिवादी नं. १ व २ यांनी नारायण हा संभाजीचा मुलगा कधीही नव्हता व नाही. तसेच नारायणला वादी नं. १ व २ हे वारस आहेत. तसेच नारायणची पत्नी रत्नाबाई व मुलगा दिलीप हे स्पष्टपणे त्याच दाव्यात नाकारलेले होते व त्या दाव्यात संपूर्ण दावा मिळकत प्रतिवादी नं. १ व २ यांची मालकी वहीवाटीची धरली. त्यामुळे या दावा मिळकतीशी वादी व प्रतिवादी नं. ३ ते ८ यांचा कसलाही हक्क हितसंबंध नाही.

१३. नारायण हा संभाजीचा मुलगा नव्हता. त्यामुळे वादी नं. १ व २ हे वारस असण्याचा प्रश्नच नाही. वादी नं. १ व २ हे कुडाळ गावचे रहिवासीदेखील नाहीत. त्याचप्रमाणे खिंडवाडी ते कुडाळ अंतर ५० ते ६० कि. मी. चे आहे. त्यामुळे वादीने जो वारसा हक्काचा दावा केलेला आहे तो पूर्णपणे खोटा व लबाडीचा आहे. सदर दाव्यास Res Judicata ची बाधा येते.

१४. वादी व प्रतिवादी नं.३ ते ८ हे एकमेकाला संगनमत आहेत व त्याचाच परिपाक म्हणून प्रतिवादी नं. ३ ते ८ यांनी जी वादीस माहिती पुरविली व या प्रतिवादीनी सदर कोर्टात रे.द.नं.१/२०१७ व २/२०१७ हया दरखास्ती दाखल केलेल्या आहेत व त्या दरखास्ती रे.दि.मु.नं. ३४/१९९९ चे हुकूमनाम्याप्रमाणे कब्जे वॉरंटचा हुकूम केलेला आहे व ती माहिती प्रतिवादी नं. ३ ते ८ यांचे बेकायदेशीर कृत्याचा भाग म्हणूनच कब्जेवॉरंटला स्थगिती मागितली आहे.

१५. वादीस रे.दि.मु.नं.३४/१९९९ मध्ये जो हुकूमनामा झाला त्या हुकूमनाम्यावर

कसलाही ताकीद अर्ज देता येणार नाही. रे.दि.मु.नं.३४/१९९९ मध्ये जो हुकूमनामा झाला आहे त्या हुकुमनाम्यास बगल देण्यासाठी किंवा त्या हुकूमनाम्याची फळे या प्रतिवादी नं. १ व २ यांना मिळू नयेत याच हेतूने सदरचा ताकीदीचा अर्ज दिलेला आहे. सदरचा अर्ज कायद्याने चालू शकत नाही. तसेच सदर हुकूमनाम्यास या वादीच्या बेकायदेशीर अर्जाने बगल देता येणार नाही. तसेच execution can not go beyond decree अशा परिस्थितीत वादीस ताकीदीचा अर्ज देता येणार नाही. वादीस प्रथमदर्शनी केस नाही. दाव्याचा कल हा या प्रतिवादी नं. १ व २ यांच्या बाजूने आहे. त्यामुळे दावा व ताकीद अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा. वादीने जाणीवपूर्वक या प्रतिवादींना त्रास देण्यासाठी खोटा व लबाडीचा दावा केला म्हणून नुकसान भरपाईची रक्कम रुपये ५०,०००/- मिळावेत अशी विनंती केली आहे.

१६. वादी प्रतिवादी यांचे वादकथनावरुन, खालील वादप्रश्न उपस्थीत होतात, सदर वादप्रश्न, त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | वादी सकृतदर्शनी प्रकरण असल्याचे शाबीत करतात काय ? | **..नाही..** |
| २) | न्यायाचे समतोलत्व वादीचे बाजूने आहे काय ? | **..नाही..** |
| ३) | मनाईचा अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | **..नाही..** |
| ४) | आदेश काय ? | **अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ४ करीता :-**

१७. वादी यांनी सदरचा दावा हा वाटपाकरीता दाखल केलेला आहे व दावा मिळकतीत त्यांचे हक्क आहेत व दावा मिळकतीबाबत रे.दि.मु.नं.३४/१९९९ हा दाखल झाला होता व सदर दाव्यामध्ये नमूद केलेल्या वाद मिळकती मयत संभाजी वाघ यांच्या हयातीत त्यांनी वडीलार्जित मिळकतीतून येणाऱ्या उत्पन्नातून बांधलेली घरे आहेत. सदर घरामधे संभाजी यांची मालकी होती व सदर मिळकतीमध्ये वादी यांचा हक्क निर्माण झालेला आहे. सदर रे.दि.मु.नं.३४/१९९९ दाव्यातील घरांचा कब्जा मागितला होता. सदर कब्जा मिळण्याकरीता रे.दरखास्त क्र.२/२०१८ दाखल केलेली होती. वादींनी दाव्यामध्ये सदर दरखास्तीची प्रत दाखल न केल्यामुळे संगणक प्रणालीमध्ये सदरची दरखास्त ही दि.०८.१२.२०१८ रोजी निकाली निघाल्याचे दिसून येत आहे.

१८. या न्यायालयाने संगणक प्रणालीवर सदर पक्षकारांबाबत प्रकरणांची माहिती पाहिली असता रे.दरखास्त क्र.१/२०१७ व रे. दरखास्त क्र. २/२०१७ या दोन दरखास्ती दिसून येत आहेत. परंतू, त्या कोणत्या दिवाणी हुकूमनाम्याच्या आहेत याचे अवलोकन होत नाही. वरील दरखास्तीपैकी रे.दरखास्त क्र.२/२०१७ ही प्रलंबित आहे. वादी यांनी सदर दरखास्तीसंबंधात कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. त्यामुळे, वादी रे.दरखास्त क्र.२/२०१८ बाबत तूर्तातूर्त मनाई हुकूम मागत आहेत याचा विचार करीता सदरची दरखास्त निकाली निघाल्यामुळे त्याबाबत कोणताही हुकूम पारीत करणे उचित होणार नाही.

१९. या न्यायालयाने रे.दरखास्त क्र.२/२०१७ चे अवलोकन केले. त्यामध्ये रे.दि.मु.नं.३४/१९९९ व रे.दि.मु.नं.९७/१९९७ याबाबत आहे असे निशाणी क्र.१ वरुन दिसून येत आहे. सदर दरखास्तींच्याबाबत वादी यांना काही हरकत असल्यास वादी यांनी सदर दरखास्तीमध्ये हरकततदार म्हणून समाविष्ट व्हावे व कब्जाबाबत हरकत नमूद करावी असे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका २१ मधील तरतूदीप्रमाणे नमूद आहे. सदर दरखास्तीमधील कार्यवाहीला या दाव्यामध्ये तूर्तातूर्त मनाईच्या आदेशान्वये मनाई हुकूम देता येणार नाही. तसेच, वादी रे.दरखास्त क्र.२/२०१८ बाबत तूर्तातूर्त मनाई हुकूम मागत आहेत. परंतू, ती दरखास्त अस्तित्वात नसल्यामुळे वादीचा अर्ज फेटाळणे उचित होणार

आहे. सबब, मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देण्यात येत असून मुद्दा क्र.४ चे उत्तराकरीता खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

वादीचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

RAVINDRA BHAGVAN KHAWALE

Digitally signed by RAVINDRA BHAGVAN KHAWALE
Date: 2024.03.20 18:13:59 +0530

**दिनांक** – २०.०३.२०२४ रविंद्र भ. खवले

**ठिकाण** – मेढा **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मेढा**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word for word as per original Order.

| | |
|---|---|
| Name of Stenographer | : Abhilash Sanjay Bagal |
| Court Name | : R. B. Khawale, J.M.F.C., Medha. |
| Order Date | : 20.03.2024 |
| Order signed by presiding officer on | : 20.03.2024 |
| Order uploaded on | : 22.03.2024 |